# विद्यापीठातील आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रात १ ऑक्टोबरपासून नोंदणी

प्रतिनिधी | जळगाव



आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र उद्घाटनप्रसंगी कुलगुरू, प्राध्यापक.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे वर्धा येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन उद्घाटन झाले.

वर्धा येथून उद्घाटन झालेल्या ५४ केंद्रांमध्ये जळगाव विद्यापीठाच्या केंद्राचा समावेश होता. उद्घाटना वेळी राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, कौशल्य व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा उपस्थित होते. विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र प्रशाळेच्या सभागृहात कार्यक्रमाच्या उद्घाटनाचे प्रक्षेपण करण्यात आले. १ ऑक्टोबरपासून नोंदणी सुरु केली जाणार आहे. भौतिकशास्त्र प्रशाळा, व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा व संगणकशास्त्र प्रशाळा येथे मेक्याट्रोनिक्स, डिजीटल मार्केटींग, अकाऊंट असिस्टंट, वेबपेज डिझायनिंग व सॉफ्टवेअर डेव्हलपर हे पाच कोर्सेस उपलब्ध करून दिले जाणार आहे.

# पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या कौशल्य विकास केंद्रांमध्ये विद्यापीठातील केंद्र

लोकमत न्यूज नेटवर्क



कौशल्य विकास केंद्राच्या ऑनलाईन उद्घाटन कार्यक्रमाचे विद्यापीठात प्रक्षेपण करण्यात आले. त्याप्रसंगी उपस्थित मान्यवर.

जळगाव : महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे दूरदृश्य प्रणालीद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते उद्घाटन झाले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विशारद कौशल्य विकास केंद्राअंतर्गत देखील हे केंद्र विद्यापीठाला मंजूर झाले असून शुक्रवारी उद्घाटन झालेल्या ५४ केंद्रांमध्ये विद्यापीठाच्या या केंद्राचा समावेश होता.

वर्धा येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाइन पद्धतीने या सर्व केंद्राचे उद्घाटन केले. यावेळी राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, कौशल्य व रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा हे सर्व ऑनलाइन पद्धतीने या कार्यक्रमास उपस्थित होते. विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र प्रशाळेच्या सभागृहात या कार्यक्रमाच्या उद्घाटनाचे प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, जिल्हा स्किल कौन्सिलचे विजय पंत व लांबोळे तसेच केंद्राच्या संयोजक व व्यवस्थापन शास्त्र प्रशाळा संचालक डॉ. मधुलिका सोनवणे, डॉ. अजय गोस्वामी आदी उपस्थित होते.

- 'आचार्य चाणक्य कौशल्य केंद्रात' १५ ते ४५ वयोगटातील विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे कोर्सेस उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. येत्या १ ऑक्टोबरपासून त्यासाठी नोंदणी सुरू केली जाणार आहे.
- भौतिकशास्त्र प्रशाळा, व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा व संगणकशास्त्र प्रशाळा येथे मेक्याट्रोनिक्स, डिजिटल मार्केटिंग, अकाऊंट असिस्टंट, वेबपेज डिझायनिंग व सॉफ्टवेअर डेव्हलपर हे पाच कोर्सेस उपलब्ध करुन दिले जाणार आहेत.

यावेळी प्रा. मधुलिका सोनवणे यांनी कौशल्य केंद्राविषयी माहिती दिली. कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी जागतिक स्पर्धेत विद्यार्थी टिकून राहण्यासाठी शिक्षणासोबत कौशल्य विकास महत्त्वाचा आहे असे सांगून या केंद्रांचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन केले. डॉ. आर. आर. चव्हाण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.